# माना जिनिंग अँड प्रेसिंग सहकारी संस्था मर्या., माना र.नं.११४

# ता.मुर्तिजापूर, जि.अकोला

## जाहीर लिलाव

जाहीर लिलावाच्या अटी शर्ती :-

१)जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमास अगर संस्थेस लिलावाच्या वेळेपुर्वी २.०० तास अगोदर उपस्थित राहून अवसायकाने निर्धारीत केलेला फॉर्म भरुन द्यावा लागेल. लिलावात भाग घेणेसाठी फॉर्म फी रु.१००/- व अनामत रक्कम रु.१०,०००/- चा भरणा रोखीने अवसायक यांचेकडे करावा लागेल.

२)ज्यांची बोली अंतीम ठरणार नाही त्यांची अनामत रक्कम त्याच दिवशी त्याच ठिकाणी लिलाव संपलेनंतर परत केली जाईल. फॉर्म फी ची रक्कम परत केली जाणार नाही.

३)संस्थेची स्थावर व जंगम मालमत्ता विभागुन विक्री करण्यात येणार नाही लिलावात बोली बोलणाऱ्यास संपूर्ण मालमत्तेकरीता बोली बोलावी लागेल.

४)जाहीर लिलावात अपेक्षेप्रमाणे किंमत न मिळाल्यास संपूर्ण लिलाव प्रक्रिया स्थगित करणे, पुढे ढकलणे, नाकारणेचा अधिकार खालील सही करणाराने राखुन ठेवला आहे.

५)जाहीर लिवातील बोली अंतिम करणेचा मालमत्तेचा काही भाग अगर हिस्सा विक्री करणे अगर न करणे याचे अधिकार खालील सही करणाराकडे राहतील.

६)ज्यांची बोली अंतिम होईल त्यांनी लिलावानंतर दुसरे दिवशी अंतिम किंमतीच्या २५% रक्कम (अनामतसह) खालील सही करणाराकडे रोखीने अथवा डी.डी.द्वारे भरणा करावी लागेल. बँकेचा डिमांड ड्राफ्ट अवसायक माना जिनिंग प्रेसींग सहकारी संस्था म., माना या नांवाने द्यावा लागेल.

७)जाहीर लिलावात विक्री केलेल्या मालमत्तेस व रकमेस मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांची मान्यता लिलावानंतर रितसर घेतली जाईल. ही मान्यता मिळालेशिवाय जाहीर लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाली असे समजले जाणार नाही. तसेच ही मान्यता मिळालेशिवाय लिलावात अंतिमत: विक्री केलेली मालमत्ता खरेदीदाराचे ताब्यात दिली जाणार नाही. अगर खरेदीदाराने भरणा केलेली अनामत रक्कम किंवा २५ टक्के रक्कम परत केली जाणार नाही.

८)जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अकोला यांनी लिलावातील मालमत्तेस व त्यांच्या अंतिम किंमतीस मान्यता दिल्यानंतर खरेदीदारास खालील सही करणाराचे निर्देशाप्रमाणे उर्वरीत रकमेचा भरणा करावा लागेल. त्यानंतरच मालमत्ता खरेदीदाराचे ताब्यात देण्यात येईल आणि त्याबाबतचे रितसर खरेदीखत नोंदवून देण्यात येईल. खरेदीखताचा संपूर्ण खर्च खरेदीदारास करावा लागेल.

९)लिलावानंतर खरेदीदाराने लिलावातील त्यांची अंतीम बोली मागे घेतल्यास अगर मा.जिल्हा उपनिबंधक, सह.संस्था, अकोला यांची मान्यता मिळालेवर मुदतीत खरेदी करुन घेण्यासाठी टाळाटाळ केल्यास खरेदीदाराने जमा केलेली अनामत रक्कम व त्यासह जमा केलेली २५% रक्कम जप्त करण्यात येईल. त्यासाठी खरेदीदाराने दिलेले कोणतेही लेखी वा तोंडी स्पष्टीकरण विचारात घेतले जाणार नाही.

१०)लिलावाची प्रक्रिया चालू असतांना काही वाद झाल्यास त्यावरील निर्णय देणे. लिलावाच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणे, काही अटी शिथील वा रद्द करणे अगर जादा अटी घालणेचा अधिकार खालील सही करणाराकडे असेल व त्यांचाच निर्णय अंतीम असेल.

ही जाहिर सुचना मी आज दि.२०.१२.२०१८ रोजी माना ता.मुर्तिजापूर जि.अकोला मुक्कामी माझ्या नावाने व सही शिक्यानिशी प्रसिध्द करीत आहे.

दिनांक :२०.१२.२०१८

विलास बा.कावरे
अवसायक
माना जिनिंग प्रेसिंग
सहकारी संस्था मर्या., माना र.नं.११४
ता.मुर्तिजापूर, जि. अकोला